
REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 7 | APRIL - 2023

# "जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, चव्हाणवाडी ता.तुळजापूर जि.उ,बाद. येथील इयत्ता ५ वी च्या विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयातील लेखनात येणाऱ्या अडचणींचा शोध व उपाय."

सुखदेव विष्णू भालेकर
एम.ए. (इंग्रजी, इतिहास, शिक्षणशास्त्र), डी.एड्., बी.एड्., डी.एस.एम.
सहशिक्षक, जि.प.प्रा.शा. चव्हाणवाडी ता. तुळजापूर जि. उस्मानाबाद

## संशोधनाची गरज :-




भाषिक कौशल्य विकास झाल्याखेरीज भाषा समजत नाही किंवा त्याचे ज्ञानही मिळत नाही. म्हणून संशोधकाने इयत्ता ५ वी च्या विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयातील वाचन कौशल्यात येणाऱ्या समस्यांची माहिती जाणून घेण्यासाठी सदरील समस्येची निवड केली आहे. सातव्याने भेडसावणारी ही समस्या सोडविण्यासाठी या समस्येचे संशोधन करण्याची गरज संशोधकाला प्राधान्याने जाणवत होती.

प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजीविषयी अनास्था व व न्यूनगंड दिसून आला तो न्यूनगंड कशामुळे उत्पन्न झाला. इंग्रजी विषयी विद्यार्थ्यांच्या मनात भिती का आहे? व ती दूर करण्यासाठी आपणास काय करता येईल या विचाराने संशोधकाला या समस्येविषयी संशोधन करण्याची गरज वाटली. विद्यार्थ्यांचे लेखन सुधारले पाहिजे.
लेखनात विद्यार्थी सरस झाला पाहिजे या उद्देशाने संशोधनाची गरज वाटली.

## संशोधनाचे महत्त्व :-

संशोधनाद्वारे समस्येचा नेमका शोध घेता येतो. त्याचबरोबर समस्येची कारणे लक्षात येऊन त्यावर उपाय योजता येतात. संशोधनच नाही केल्यास समस्येचे समाधान होवू शकत नाही.

विद्यार्थ्यांना नेमक्या कोणत्या समस्या आहेत ते संशोधनानेच समजते. सदरील संशोधनात जी समस्या मांडली आहे ती जाणवण्याचे श्रेय संशोधनासच जाते. विद्यार्थ्यांना इंग्रजी लेखन या घटकात येणाऱ्या समस्यांवर उपाय योजना करण्यासाठी संशोधन प्रक्रिया महत्वपूर्ण भूमिका बजावते.

## समस्या विधान :-

"जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, चव्हाणवाडी ता. तुळजापूर जि.उस्मानाबाद येथील इयत्ता ५ वी च्या विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयातील लेखनात येणाऱ्या अडचणींचा शोध व उपाय."

## संशाधनाची उद्दिष्टे :-

१) इंग्रजी लेखनातील समस्यांचा शोध घेणे.
२) विद्यार्थ्यांचे इंग्रजी लेखन सुधारण्यासाठी योग्य त्या शैक्षणिक साहित्याचा वापर करुन शिकविणे.
३) लेखनासाठी सराव करुन घेणे.
४) लेखन संपादनाची परिणामकारकता अंतीम चाचणीद्वारे पडताळून पाहणे.

**गृहितके :-**

१) लेखन कौशल्य वापरासाठी श्रवण चांगले असणे आवश्यक आहे.
२) लेखनाचा सराव घेतल्याने चूका कमी होतात.

**परिकल्पना :-**

१) जर योग्य शैक्षणिक साहित्य वापरले तर विद्यार्थ्यांच्या लेखनात सुधारणा होईल.
२) योग्य मार्गदर्शन विद्यार्थ्यांमध्ये लेखनाची आवड निर्माण होईल.
३) जर अधिक सराव घेतला तर विद्यार्थ्यांचे लेखन संपादनावर लक्षणीय धन परिणाम झालेला दिसेल.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :-**

१) सदरील संशोधन हे जि.प.प्रा.शाळा चव्हाणवाडी ता.तुळजापूर जि.उस्मानाबाद. या शाळेपुरतेच मर्यादीत आहे.
२) सदरील संशोधन इयत्ता ५ वी च्या विद्यार्थ्यांपुरते मर्यादित आहे.
३) सदर संशोधन हे इंग्रजी विषयापुरतेच मर्यादित असून त्यातील लेखन कौशल्यापुरतेच मर्यादित आहे.
४) सदरील संशोधन हे सन २०१९-२०२० या मराठी माध्यम शैक्षणिक वर्षाशीच निगडीत आहे.

**३.१ संशोधनाची प्रत्यक्ष कार्यवाही :-**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, चव्हाणवाडी ता.जि.उस्मानाबाद येथील इयत्ता ५ वी च्या विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयातील लेखन घटकात येणाऱ्या समस्यांचा शोध व उपाय हे संशोधन करण्यासाठी संशोधकाने मुख्याध्यापकांची भेट घेऊन कृतिसंशोधनासाठी सनदशीर मार्गाने परवानगी घेतली.

मुख्याध्यापकांच्या परवानगीने संशोधकाने ६ वी च्या विद्यार्थ्यांची लेखन घटकावर आधारीत २० गुणांची पूर्वचाचणी घेतली.

त्यानंतर पूर्वचाचणीचे पेपर तपासले त्यावरुन विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी समजल्या.

**♦ विद्यार्थ्यांना आलेल्या अडचणी :-**

१. विद्यार्थ्यांना वाचून लिहिता येत नाही.
२. विद्यार्थी स्पष्ट लेखन करत नाहीत.
३. विद्यार्थ्यांकडून उच्चार बरोबर होत नाही.
४. विद्यार्थी लिहिलेले सर्वच बरोबर लिहित नाहीत.

**♦ यासाठी संशोधकाने पुढील उपक्रम राबवले.**

१. प्रथम विद्यार्थ्यांना स्पष्ट पाहण्यास सांगितले.
२. नंतर विद्यार्थ्यांस चार-पाच अक्षरे असणारे शब्द बघुन वाचण्यास सांगितले.
३. त्यानंतर ८ ते १० अक्षरे असणारे शब्द विद्यार्थ्यांस बघुन लिहिण्यास सांगितले.
४. त्यानंतर शिक्षकाने परिछेद वाचून तो लिहिण्यास सांगितला.
५. विद्यार्थ्यांचे गट केले व त्यामधील एकास लिहण्यास व बाकीना वाचन्यास सांगितले.
६. त्यानंतर टेपरेकॉर्डरचा उपयोग करुन त्यावर ऐकवून वाचन्यास सांगिले.
७. लेखन या घटकावर अधिक सराव घेतला.
८. प्रत्येकाला वैयक्तिक मार्गदर्शन केले.

**♦ संशोधकाला आलेल्या अडचणी :-**

१. विद्यार्थ्यांना वाचन समजणे कठीण जाते.
२. विद्यार्थ्यांना ऐकूण लेखन करता येत नाहीत.
३. विद्यार्थ्यांची लेखन क्षमता कमी आहे.
४. विद्यार्थ्यांना शब्दाच्या स्पेलिंग पाठ नाहीत.

**♦ संशोधकाने केलेल्या उपाययोजना :-**

१. प्रथमतः विद्यार्थ्यांना लेखन म्हणजे काय हे समजावून सांगितले.
२. विविध शब्द, वाक्य विद्यार्थ्यांकडून लिहून घेतले.
३. श्रवण कौशल्याचा विकास करण्यासाठी विविध शैक्षणिक साहित्याचा वापर केला.
४. विद्यार्थ्यांचा अधिकचा सराव घेतला.

**समारोप :-**

सदरील संशोधनाचा सारांश नमूद करण्यात आला आहे. तसेच संशोधनाचे फलित म्हणजे पूर्वचाचणी, अंतीम चाचणी यांची तुलना व एकूण संशोधनातून मिळालेले निष्कर्ष नमूद करण्यात आलेले आहेत. पुढील संशोधनासाठी विषय सुचविण्यात आलेले आहेत.

**संदर्भसूची**

१. प्रा.सौ. स्वाती गाडगीळ - कृतिसंशोधन व नवोपक्रम (२००७) सुविचार प्रकाशन, पुणे.
२. डॉ.व.झा.साळी, डॉ.सुरेश करंदीकर, डॉ.बी.जी.अहिरे-कृतिसंशोधन व नवोपक्रम (ऑक्टोबर २०१०) फडके प्रकाशन, कोल्हापूर.
३. Third Language - English सुविचार प्रकाशन.
४. सौ.समनाझ ईराणी, सरोजा नागर, धनवंती हर्डीकर, My English Book five इ std. five (मराठी माध्यम) २००७.



**सुखदेव विष्णू भालेकर**
**एम.ए. (इंग्रजी, इतिहास, शिक्षणशास्त्र), डी.एड्., बी.एड्., डी.एस.एम.**
**सहशिक्षक, जि.प.प्रा.शा. चव्हाणवाडी ता. तुळजापूर जि. उस्मानाबाद.**